# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ३१ जुलै, २०१५ / श्रावण ९, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वित्त आणि नियोजन, वने मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री** | |
| **(३)** | **जलसंपदा मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५३**

---

### वर्धा जिल्हयातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदांबाबत

**(१) * २७७६८ श्री.रणजित कांबळे (देवळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालयांमध्ये वर्ग १ ची २८ पदे मंजूर असून त्यातील १७ पदे मागील अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत. तसेच वर्ग २ च्या ८४ मंजूर पदांपैकी २० पदे व वर्ग ३, ४ ची अनुक्रमे ६६ व ५५ पदे माहे जून, २०१५ पर्यंत रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, देवळी (जि.वर्धा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील, रिक्त पदांबाबत वारंवार पाठपुरावा करुन सुध्दा मंजूर असलेले एकही पद माहे जून, २०१५ पर्यंत भरण्यात आलेले नाही. उपरोक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

वर्धा जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालयांमध्ये गट-अ (वर्ग-१) ची २८ पदे मंजूर असून त्यापैकी ११ पदे भरलेली व १७ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची ८५ पदे मंजूर असून त्यापैकी ६८ पदे भरलेली व १७ पदे रिक्त आहेत. गट-क संवर्गाची ४०६ पदे मंजूर असून त्यापैकी ७२ पदे रिक्त आहेत व गट-ड संवर्गाची २२८ पदे मंजूर असून त्यापैकी ४६ पदे रिक्त आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय देवळी हे नवनिर्मित ग्रामीण रुग्णालय असून येथील औषधनिर्माण अधिकाऱ्याचे पद भरण्यात आलेले आहे. गट-अ (वर्ग-१) संवर्गाची रिक्त पदे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. गट-क व गट-ड संवर्गाची पदे भरण्याबाबत कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हा आरोग्य विभागाने दहा लाख किंमतीची औषधे**
**जळगाव जिल्हयात विक्रीसाठी पाठविल्याबाबत**

**(२) * २५४५७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील साथीचे रोग आटोक्यात आणण्यासाठी आलेल्या ॲन्टीबायोटीक्स २५० एमजी च्या दोन लाख गोळ्या, भूल द्यायच्या इजंक्शनच्या एक हजार बॉटल अशी जवळ-जवळ दहा लाख रुपये किंमतीची औषधे रायगड जिल्हा आरोग्य विभागाने परस्पर विक्रीसाठी जळगाव जिल्हयात एस.टी.ने पाठविली असल्याची तक्रार स्थानिक संघटनेने माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.आरोग्य मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा आरोग्य अधिका-यांना औषधे पाठविण्याचा कोणताही अधिकार नसताना आदिवासी व आर्थिक दुर्बलांसाठी आलेल्या औषधांची परस्पर विक्री करुन मोठ्या प्रमाणात होणा-या गैरव्यवहाराबाबत शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कारवाईचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

जिल्हा शल्यचिकित्सक, जळगाव यांनी दिनांक १०.०४.२०१५ रोजी Ciprofloxacine Tab २५० mg, Ciprofloxacine Tab ५०० mg आणि Ligonocaine Hcl २% Inj. या औषधांची मागणी जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड यांच्याकडे केली होती. त्यानूसार सदर औषधांचे १२ बॉक्स दिनांक १८.०४.२०१५ रोजी एसटी पार्सलने जळगाव येथे पाठविताना स्थानिक संघटनेने गैरसमजुतीने औषध परस्पर विक्रीसाठी पाठविण्यात येत असल्याबाबतची तक्रार जिल्हा पोलिस ठाणे, अलिबाग यांच्याकडे नोंदविली आहे.

प्राथमिक चौकशीनंतर सदर औषधे दिनांक २९.०४.२०१५ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक, जळगाव यांना प्राप्त झाली आहेत.

(२) एखाद्या औषध साठ्याच्या मुदतबाह्या दिनांक जवळ असेल व त्या औषधांचा वापर सदर कालावधीत होत नसेल तर ई-औषधी संगणक प्रणालीद्वारे इतर जिल्ह्यातील आरोग्य सस्थांना त्यांच्या मागणीनूसार सदर औषधांचा पुरवठा करता येतो.

सदर औषधे जिल्हा शल्यचिकित्सक, जळगाव यांना त्यांच्या मागणीनुसार जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड यांनी दिनांक १८.०४.२०१५ रोजी ई-औषधी संगणक प्रणालीद्वारे वितरित केली आहेत.

सदरची कार्यवाही आरोग्य सेवा संचालनालयाच्या दिनांक २२.१२.२०१० च्या पत्रातील मार्गदर्शक सुचनानुसार तसेच ई-औषधी संगणक प्रणालीवरील मार्गदर्शक सुचनानुसार करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बेस्टच्या परिवहन उपक्रमास मूल्यवर्धीत करातून सवलत देण्याबाबत

**(३) * २७७३६ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्टचा परिवहन उपक्रम सद्य:स्थितीत तोटयात सुरु असून, डिझेल व सी.एन.जी. इंधन खरेदीसाठी, मूल्यवर्धीत कारापोटी दरवर्षी सुमारे ६६ कोटी रुपयांचा भार बेस्ट उपक्रमास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्टच्या परिवहन उपक्रमास मूल्यवर्धीत करातून सवलत मिळण्यासाठी सचिव (वित्त) यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने बेस्ट उपक्रमास मूल्यवर्धीत करातून सवलत देण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. सध्याचा भार रु. ५७ कोटी इतका आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शासनाचे मूल्यवर्धित कायद्यांतर्गत विशिष्ट उपक्रमास सुट देण्याचे धोरण नाही. बेस्ट उपक्रमाप्रमाणे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांनीसुध्दा करसवलतीची मागणी केली होती. बेस्ट व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांची करसवलीतीची मागणी मान्य केल्यास, इतर शहरातील परिवहन मंडळांकडुन देखील करसवलतीची मागणी होऊ शकते व पर्यायाने महसूल हानी संभवते. त्यामुळे बेस्ट उपक्रमाची तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन (एस.टी.) महामंडळाची, पेट्रोल व डिझेलवरील कर सवलतीची मागणी मान्य करण्यात आली नाही.

(४) लागू नाही.

-----------------

## नांदेड येथील कुंटूर ते देगाव पांदण रस्त्यावरील कोल्हापूरी बंधारा बांधकामाच्या गैरव्यवहाराबाबत

**(४) * २५९३० श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील कुंटूर ते देगाव पांदण रस्त्यावर कोल्हापूरी बंधारा बांधकामात ठेकेदार व बांधकाम विभागाच्या अधिका-यांच्या संगनमताने या बंधा-याचे काम पूर्ण न करताच २० लाख रुपये ठेकेदारांना देण्यात आले असून या बंधा-याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधा-यांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे वरिष्ठ अधिका-यांनी या कामाची गुणनियंत्रक पथकाद्वारे तपासणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

सदरील बंधारा हा देगाव ते कुंटूर नाल्यावर बांधण्यात येत असून सदरील बंधाऱ्याचे फांउन्डेशनचे काम मे, २०१३ मध्ये पूर्ण झाले होते व त्याचे देयक रुपये १९.४४ लक्ष अदा करण्यात आले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लातूर जिल्हयासाठी आरोग्य विभागाच्या अंतर्गत १०० खाटांच्या रुग्णालयाला मान्यता मिळूनही बांधकामास सुरुवात न झाल्याबाबत**

**(५) * २०२०४ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील जिल्हा रुग्णालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विलीन केल्यामुळे लातूर शहरात जिल्हा रुग्णालय नसल्यामुळे आरोग्य विभागाने दिनांक १७ फेब्रुवारी, २०१३ रोजी १०० खाटांच्या रुग्णालयाला मान्यता दिली असुन या मान्यतेसोबत बृहत आराखडाही मंजूर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्हयासाठी आरोग्य विभागाच्या अंतर्गत १०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयास मंजूरी मिळून ३ वर्षांचा कालावधी झालेला असतानाही अद्याप जिल्हा रुग्णालयाच्या उभारणीचे काम हाती घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) सदरहू रुग्णालयाच्या उभारणीचे काम लवकरात लवकर हाती घेवून जिल्हा रुग्णालय कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत राज्यात आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखड्यात लातूर येथे १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) लातूर येथे १०० खाटांच्या रुग्णालयाच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध नसल्याने उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर यांनी आयुक्त, महानगरपालिका, लातूर, तहसिलदार, लातूर तसेच जिल्हाधिकारी, लातूर यांना जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे. जागा उपलब्ध झाल्यानंतर सदर रुग्णालयाचे उभारणीचे काम हाती घेण्यात येईल.

-----------------

**मौजे ममदापूर (ता.कर्जत, जि.रायगड) येथे विकासकाने स्मशानभूमीच्या जागेत घराचे बांधकाम केल्याबाबत**

**(६) * २०९८८ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ममदापूर (ता.कर्जत, जि.रायगड) येथे ग्रामपंचायतीचा बांधकामाचा दाखला न घेता एका विकासकाने स्मशानभूमीच्या जागेत घराचे बांधकाम केल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार स्मशानभूमीच्या जागेत अतिक्रमण करुन बांधलेले अतिक्रमित बांधकाम काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील अंगणवाडीतील बालकांना पुरविण्यात आलेली राजगिरा चिक्की मातीमिश्रित असल्याबाबत

**(७) * २६५०१ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील अंगणवाडीतील बालकांना पुरक आहार म्हणून पुरविण्यात आलेली राजगिरा चिक्की मातीमिश्रित असल्याचे नुकतेच माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चिक्कीच्या तब्बल ७ लाख ७७ हजार पाकिटांचा जिल्ह्यात पुरवठा झालेला असून पुरवठा करणारी कंपनी आयएसओ मानांकन प्राप्त असल्याचे पाकिटावर नमुद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार, दोषी कंपनीविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सभापती, पंचायत समिती, अहमदनगर यांनी दि.५/६/२०१५ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन सभेमध्ये राजगिरा चिक्की निकृष्ठ दर्जाची असल्याची तक्रार केली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रकल्प स्तरावर चौकशी करुन दि.०५/०६/२०१५ पासून राजगिरा चिक्कीचे वाटप बंद करुन चिक्कीचे पाकिट जप्त करण्यात आली व चिक्कीचे नमूने पंचनामा करुन प्रकल्पस्तरावर ठेवण्यात आले. दि.२०/०६/२०१५ रोजी अन्न व औषध प्रशासन अधिका-यांच्या समक्ष पंचनामा करुन पुणे व नाशिक येथील शासकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. सदर चिक्की नमुने अहवाल जिल्हा परिषद कार्यालयास प्राप्त झाले असून सदर अहवालामध्ये राजगिरा चिक्की खाण्यास योग्य असल्याचे नमूद केले आहे.

दरम्यानच्या काळात अन्न व औषध प्रशासनाच्या अहमदनगर कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिका-यांनी राजगिरा चिक्कीचे तीन नमुने दि.०२/०७/२०१५ रोजी विश्लेषणास घेऊन राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे पाठविले होते. राज्य प्रयोगशाळा, पुणे यांचे अहवालानुसार उक्त राजगिरा चिक्कीमध्ये वाळूचे कण आढळून आल्यामुळे ही मुलांना खाण्यासाठी अयोग्य (Ineadible) असल्याचे नमूद

केले आहे. त्यानुषंगाने संबंधित पुरवठाधारक संस्थेस कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असून राजगिरा चिक्कीचा पुरवठा तात्काळ थांबविण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर प्रकरणी चौकशी सुरु असून चौकशीअंती योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्रकल्पाने तळंदगे ग्रामपंचायतीचा कर थकविल्याबाबत**

**(८) * २४३६३ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्रकल्पाने तळंदगे ग्रामपंचायतीचा सुमारे ४० लाखांचा कर थकविला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येऊनही अद्यापही शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे ही ग्रामपंचायत आर्थिक संकटात सापडली असून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करणारा हा धोकादायक प्रकल्प कायमचा बंद करण्याची मागणी तेथील नागरिकांनी संबंधितांकडे वांरवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) ग्रामपंचायत तळंदगे यांनी पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्रकल्पासाठीची सन २००८-०९ ते सन २०१४-१५ अखेरची एकूण थकबाकी रक्कम रु.३९,३२,९७५/- इतकी असल्याचे दि.०९.१०.२०१४ च्या पत्रान्वये औद्योगिक वसाहतीस कळविले.

तथापि, सदर कर मान्य नसल्याचे कार्यकारी अभियंता, म.औ.वि.म. विभाग कोल्हापूर यांनी दि.१३.१०.२०१४ रोजीच्या पत्राने ग्रामपंचायतीस व दि.१४.११.२०१४ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेस कळविले.

त्यानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सीईटीपी प्रकल्पाची मोजमापे म.औ.वि.मं. यांचे अभियंता व ग्रामपंचायत कार्यकारिणी यांच्या उपस्थितीत संयुक्तपणे घेण्यात येवुन, प्रकल्प एप्रिल, २००९ मध्ये बांधून पूर्ण करुन कार्यान्वित झाला असल्याने, सीईटीपी प्रकल्पाच्या करापोटी सन २००९-१० ते सन २०१४-१५ पर्यंतचे प्रतिवर्षी रु.३.०० लाख प्रमाणे एकूण रक्कम रु.१८.०० लाख इतकी रक्कम ग्रामपंचायतीने मान्य करुन त्यानुसार सीईटीपी प्रकल्पासाठी ग्रामपंचायत तळंदगे यांनी रु.१८.०० लाख इतक्या रकमेचे देयक दिनांक २४.१२.२०१४ रोजी दिले.

ग्रामपंचायत तळंदगे यांचेकडे गावासाठी औद्योगिक वसाहतीकडून घेत असलेल्या पिण्याच्या पाण्यासाठीची ऑगस्ट २०१२ ते नोव्हेंबर २०१४ या कालावधीतील थकीत पाणीपट्टीची रक्कम रु.१६,२६,८७०/- इतकी होती. सदर रक्कम कपात करुन सीईटीपी प्रकल्पाच्या करापोटी रक्कम रु.१,७३,१३०/- एवढ्या रकमेचा कर भरलेबाबतचा धनादेश कार्यकारी अभियंता म.औ.वि.मं. विभाग कोल्हापूर यांच्या दि.२६.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये ग्रामपंचायत तळंदगे यांचेकडे जमा करण्यात आलेला आहे. त्यामुळे ग्रामपंचायत तळंदगे यांची पंचातारांकित औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्रकल्पाकडे कराची रक्कम थकीत राहिलेली नाही.

ग्रामपंचायत तळंदगे यांनी दि.०५.०९.२०१४ रोजीच्या पत्रान्वये सीईटीपी प्रकल्पामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, उप विभाग, इचलकरंजी यांनी चेअरमन, सीईटीपी प्रकल्प यांना नोटीस बजावली असून, त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**शेलुबाजार (ता.मंगरुळपीर जि.वाशीम) व मानोरा तालुक्यातील अवैध वृक्षतोड थांबवून जंगलमाफीयांवर कारवाई करण्याबाबत**

**(९) * २६५६२ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेलुबाजार (ता.मंगरुळपीर, जि.वाशीम) येथील नैसर्गिक वनसंपदा नष्ट होण्याच्या मार्गावर असून अवैध वृक्षतोड थांबवून जंगलमाफीयांवर वेळीच आळा घालण्याची मागणी निसर्ग प्रेमींमार्फत संबंधित विभागाकडे दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास करण्यात आली असून या परिसरामध्ये तलाठी यांनी अवैध वृक्षतोड करणारे व त्याची वाहतूक करणारे एका ट्रकला सुध्दा मागील काही दिवसापूर्वी पकडले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मानोरा (जि.वाशिम) तालुक्यामध्ये बेकायदा वृक्षतोडीबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे व सबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन सुध्दा शेंदुरजना (अ), पाळोदी, रतनवाडी, रुई गोस्ता, वडफळमेंद्रा, कोंडोली परिसरातील गोखी नदीच्या काठाच्या भागात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्ष तोड झाली असल्याची बाब उपवनसंरक्षण अधिकारी अकोला येथे दिनांक १२ मे, २०१५ रोजी वा सुमारास दौऱ्यावर आले असल्याने त्यांच्या पाहणी दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अवैध वृक्षतोड व वाहतूक करणाऱ्या टोळीवर व त्यांना अभय देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, अद्यापही सदरहू प्रकरणी प्रस्ताव पाठविण्याच्या कारवाईमध्ये दिरंगाई होत असल्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) प्रश्नात नमूद ठिकाणी अवैध वृक्षतोड थांबवून जंगल माफीयांवर वेळीच आळा घालण्याची मागणी दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निसर्ग प्रेमींनी केली ही बाब वस्तूस्थितीवर आधारित नाही. तसेच तलाठी, यांनी अवैध वृक्षतोड करणारे व वाहतूक करणारे ट्रकला पकडण्याची बाब खरी नाही.
(२) हे खरे नाही. तथापि, उपवन संरक्षक अकोला यांना दि. ०२.०५.२०१५ च्या दौऱ्यात मानोरा वनपरिक्षेत्रातील फुलउमरी नियत क्षेत्रात अवैध तोडीची दोन साग थुटे आढळली व त्याबाबतचा वनगुन्हा दि.२९.०४.२०१५ अन्वये जारी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. दिनांक १५.५.२०१५ चे दौ-यात अवैध वृक्षतोड आढळली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाडेगांव ( ता.बाळापूर, जिल्हा अकोला ) येथे इंदिरा आवास व रमाई आवास योजने अंतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१०) * २७०५७ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडेगांव (ता.बाळापूर, जि.अकोला) येथे इंदिरा आवास व रमाई आवास योजने अंतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार माहे जून, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, घरकूल योजनेतील गरजू लाभार्थींना वगळून व प्रतीक्षा यादी डावलून स्थानिक पदाधिकारी व ग्रामविकास अधिकारी यांनी संगनमत करुन सरकारी कर्मचाऱ्याला सुध्दा ह्या योजनेचा लाभ देण्याचे तक्रारीत नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा तक्रारीवर शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुषंगाने दोषींवर काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

इंदिरा आवास योजनेअंतर्गत मंजूरी दिलेल्या ४४९ लाभार्थ्यांपैकी १० लाभार्थ्यासंदर्भात अनियमितता झालेली आहे.

(३) सन २०१४-१५ मध्ये वाडेगांव ग्रामपंचायतीस अनुसूचित जातीकरिता ४१२ व अल्पसंख्यांकाचे ३७ असे एकूण ४४९ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. तसेच रमाई योजनेमधून १५ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले असून त्याप्रमाणे घरकुल मंजूर प्रदान करण्यात आली आहे.

यासंदर्भात श्री.मंगेश शामराव तायडे, माजी सैनिक यांची दि.२५.६.२०१५ च्या पत्रान्वये तक्रार प्राप्त झाली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती बाळापूर यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

इंदिरा आवास योजनेअंतर्ग मंजूरी दिलेल्या ४४९ लाभार्थ्यांपैकी ९ लाभार्थ्यांना दुबार दिल्याचे निदर्शनास आले आहे. या ९ लाभार्थ्यांपैकी श्री.चंद्रभान गणपत अवचार यांना दोन हप्ते तर उर्वरित ८ लाभार्थ्यांना घरकुलाचे पूर्ण म्हणजे रु.९५,०००/- प्रमाणे अनुदान अदा झाल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारे अदा करण्यात आलेल्या रु.८,३०,०००/- इतकी रक्कम वसूलपात्र आहे.

तसेच श्री.रमेश जगदेव वानखेडे यांचे ऐवजी श्री.राजु जगदेव वानखेडे यांना शासकीय नौकरीमध्ये असतांना लाभ दिल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये श्री.राजु जगदेव वानखडे यांना रु.३५०००/- चा पहिला हप्ता अदा करण्यात आलेला आहे. सदरचा पहिला हप्ता वसूल करण्यात आला असून तो पंचायत समिती येथील खात्यात जमा करण्यात आलेला आहे.

(४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर यांच्या चौकशी अहवालानुसार दोषी असलेल्या ग्राम विकास अधिकारी, श्री.एम.एस.शेगोकर यांना तसेच श्री.राजू जगदेव वानखडे, कनिष्ठ सहाय्यक, बांधकाम उप विभाग, बाळापूर या कर्मचा-यास देखील, जिल्हा परिषद (शिस्त व अपील) नियम, १९६७ मधील कलम ४ चा भंग केल्यामुळे दि.१६.७.२०१५ आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत स्मशानभूमी कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(११) * २७१७३ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या वर्षात स्मशानभूमी विकास कामामध्ये दोन वेगवेगळ्या बनावट प्रशासकीय मान्यतेसाठी प्रति काढून लाखो रुपयांच्या निधीचा अपहार केल्याप्रकरणी उपमुख्य कार्यकारी आधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांच्या गैरकारभाराची चौकशी करण्यासंबधीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांनी शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. जिल्हा परिषद, नांदेड यांनी प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला नाही.

तथापि कंधार तालुक्यातील महालिंगी या ग्रामपंचायतीला चुकीच्या पध्दतीने अग्रिम मंजूर केल्याची बाब जिल्हा परिषद स्तरावर निदर्शनास आली. जिल्हा परिषदेने निधी तात्काळ वसूल करण्याबाबत कळविल्यानुसार सरपंच/ग्रामसेवक, महालिंगी यांचेकडून अग्रीम रु.१,६०,०००/- पैकी रु.९०,०००/- चलनाद्वारे शासन खाती जमा करण्यात आले आहे. उर्वरित रक्कम भरणा करण्याबाबत लेखी कळविले आहे.

----------------

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मागणी नसतानांही सोडीअम हायड्रोक्लोराइडची खरेदी करण्यात आल्याबाबत**

**(१२) * २३१५७ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा व कॅन्टोन्मेंट बोर्ड अशा ७५ स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मागणी नसतानांही नॅशनल अर्बन हेल्थ मिशन अंतर्गत साडेचार कोटी रूपयांचे सोडीअम हायड्रोक्लोराइडची खरेदी करण्यात आल्याचे दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) सदर औषधाची आवश्यकता नसल्याने ते वीनावापर पडून मुदत बाहय होवू नये म्हणून नाशिक महापालिकेने या औषधाचा ट्रक दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान आरोग्य सेवा संचालनालयास परत पाठवून दिला, हे खरे आहे काय,

(३) तसेच, सिंहस्थासाठी सिव्हील हॉस्पिटल आणि जिल्हा परिषदेकडून आरोग्य सेवा संचालनालयाला औषधे खरेदीसाठी २७ वेळा स्मरणपत्रे देवूनही औषधे व साधनसामुग्री मिळत नसल्यामुळे सिंहस्थात आरोग्य विभागासमोर यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील एकूण ९५ स्थानिक स्वराज्य संस्था व इतर ग्रामीण आरोग्य संस्था यांनी केलेली मागणी विचारात घेऊन एकूण रु.४,४२,९७,९७०/- एवढ्या रकमेचे सोडियम हायपोक्लोराइड खरेदी करण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

नाशिक महानगरपालिकेची औषधाची मागणी, तेथील ४ रुग्णालये, १७ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि तेथे आयोजित करण्यात येणा-या सिंहस्थ कुंभमेळाच्या निमित्ताने जमा होणारा जनसमूदाय विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात मागणी पेक्षा थोडा अधिकचा सोडियम हायपोक्लोराइडचा पुरवठा नाशिक महानगरपालिकेस करण्यात आला होता. परंतु सदर औषधाचा साठा करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध

नसल्याने आवश्यकतेनुसार औषधाचा साठा नाशिक मनपाने ठेवून उर्वरित औषधे पुरवठादाराकडे परत पाठविण्यात आली.

(३) हे खरे नाही.

सहसंचालक आरोग्य सेवा राज्यस्तर, मुंबई यांचेकडून सिंहस्थ कुंभमेळाच्या नियोजनासाठी रु.२,३९,२२,३८२/- एवढा निधी उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ नाशिक यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रामा केअर युनिटला मान्यता मिळण्याबाबत**

**(१३) * २७३०७ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील चिखली हे शहर राष्ट्रीय महामार्गावर असुन जालना खामगाव रस्त्यावर वारंवार अपघात घडत असल्यामुळे चिखली येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रामा केअर युनिटची मागणी शासनाकडे वेळोवेळी करण्यात येवूनही मागणी पुर्ण होत नसल्याने गंभीर रुग्णांची हेळसांड होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाकडून काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

चिखली येथे ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहे. तथापि निकष पूर्ण करत नसल्यामुळे त्याठिकाणी ट्रामा केअर युनिटची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आलेली नाही. जालना, बुलढाणा आणि खामगांव येथे अपघात ग्रस्तांना आवश्यक रुग्णसेवा दिली जाते.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे अर्धमसला (ता.गेवराई, जि.बीड) गावात कावीळ आणि ट्रिपलचा डोस दिल्यानंतर बालिकेचा झालेला मृत्यू**

**(१४) * १७२११ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अर्धमसला (ता.गेवराई, जि.बीड) गावात कावीळ आणि ट्रिपलचा डोस दिल्यानंतर अवघ्या चार तासातच बालिकेचा मृत्यू झाल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या घटनेची चौकशी करून काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) बालिकेचा मृत्यू लसी दिल्यानंतर झाला हे खरे आहे.

तथापी मृत्यू Asphyxia due to aspiration and milky white fluid या कारणामुळे झालेला आहे.

(२) सदर घटना घडताच सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडून चौकशी करण्यात आली आहे. तसेच लसींचे नमुने दि.१७.०४.२०१५ रोजी तपासणीसाठी केंद्रीय प्रयोगशाळा कसौली (हिमाचल प्रदेश) येथे तात्काळ पाठविण्यात आले होते व त्याचा अहवाल प्राप्त झाला असून सदर लसी स्टँडर्ड क्वालिटीच्या असल्याचे अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे सदरचा मृत्यू हा लसीमुळे झालेला नसून Asphyxia due to aspiration and milky white fluid मुळे झालेला आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**तापी पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत धुळे जिल्ह्यातील सुलवाडे-जामफळ-कानोली उपसासिंचन योजनेच्या भौतिक कामांसाठी निधी मिळण्याबाबत**

**(१५) * १६४९१ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी. पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तापी पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत धुळे जिल्ह्यातील सुलवाडे-जामफळ-कानोली उपसासिंचन योजनेस सन १९९९ साली प्रशासकीय मान्यता मिळाली असून सप्टेंबर, २०१२ अखेरे पर्यंत योजनेच्या सर्वेक्षण, संकल्पना,

वन-जमिन संपादन इत्यादी बाबींवर ८ कोटी ९२ लाख रुपये खर्च झाले आहे, परंतु पुढील भौतिक कामांसाठी सदर योजनेसाठी निधीची उपलब्धता नसल्याने काम प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन याबाबतीत काही धोरण ठरविणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(४) असल्यास, त्यानुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

सन १९९९ मध्ये रु. ७८८.८९ कोटी किंमतीत प्रशासकीय मान्यता दिलेल्या या योजनेवर माहे जानेवारी, २०१५ अखेर सर्वेक्षण, संकल्पन, वनजमीन संपादन इत्यादी बाबीवर रु. ७.९५ कोटी खर्च झाला आहे. भौतिक कामास अद्यापी सुरुवात झालेली नाही.

(२) व (३) दिनांक १०/६/२०१३ च्या शासन निर्णयानुसार ज्या प्रकल्पांवर मूळ प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ५ वर्षात १०% किंवा त्यापेक्षा कमी खर्च झालेला आहे. अशा प्रकल्पांच्या बाबतीत सुधारीत प्रशासकीय मान्यता घेतल्याशिवाय त्याप्रकल्पावर पुढील खर्च करु नये असे धोरण आहे.

(४) रु.२०३४.७१ कोटी किंमतीचा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्रात ऑन लाईन खाजगी लॉटरी परवाने धारकांकडून शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडविला जात असल्याबाबत

**(१६) * २२०५० श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात ऑन लाईन खाजगी लॉटरी परवाने धारकांकडून शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडविला जात असल्याबाबतचे पत्र मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ मे, २०१५ रोजी शासनास दिलेले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गोवा, सिक्कीम, भूतान, मिझोरम व अन्य राज्यांच्या लॉटरी (ऑन लाईन लॉटरी सहीत) चालविण्याचे काम काही कंपन्यांनी घेतले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर लॉटरी चालविणा-या कंपन्यांची व त्यांचे संचालक, मालक यांची नावे काय आहेत, या कंपन्या लॉटरी (ऑन लाईन लॉटरी सहीत) चालविताना शासनाचा कर थकवून कंपन्या बंद करतात, नंतर याच कंपन्या नव्याने स्थापन करुन पुन्हा हेच उद्योग सुरु ठेवतात. यामध्ये स्टारलॉक या कंपनीने शासनाची कोट्यावधी रुपयांची फसवणूक केली असून याच कंपनीला मेनस्टार नावाने नविन परवाना दिला गेल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा किती व कोणकोणत्या कंपन्यांनी शासनाचा एकूण किती कोटी रुपयांचा महसूल बुडविला आहे, तसेच या कंपन्या व त्यांच्या मालकांवर दंडात्मक कारवाई केली आहे काय,

(५) असल्यास, अशा प्रकारास दोषी असणाऱ्या व लॉटरीजवर नियंत्रण ठेवणा-या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच भविष्यात असे प्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) हे अशंत: खरे आहे.

सध्या राज्यात गोवा, सिक्कीम व मिझोराम राज्यांच्या लॉटरी योजनांची विक्री करण्यात येते. आयोजक राज्ये ठोक अभिकर्ते/प्रवर्तक नेमून राज्यात त्यांच्या लॉटरी योजनांची तिकिट विक्री करतात.

(३) सध्या राज्यात गोवा, सिक्कीम व मिझोराम राज्यांच्या लॉटरी चालविणाऱ्या कंपन्यांची व त्यांचे संचालक/मालक यांची नावे पुढीलप्रमाणे -

मे.सेरेनिटी ट्रेडर्स प्रा.लि., संचालक, श्री.हरकचंद पी.छेडा.

मे.पॅन इंडिया नेटवर्क लि., संचालक, श्री.प्रल्हाद सोहनलाल मुंद्रा

मे.इनलॉट ई गेमिंग सोल्यूशन प्रा.लि.-श्री.सरप्रस्थवन के.सामी

मे.पूजा मार्केटिंग भागिदार, श्री.भावेश जे. शाह

या उप प्रश्नातील पुढील भाग "स्टारलॉक या कंपनीने शासनाची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली असून याच कंपनीला मेनस्टार नावाने नविन परवाना दिली गेल्याची बाब निदर्शनास आली आहे," हे खरे नाही. स्टार लॉक व मेनस्टार या नावाच्या कंपनीची नोंदणी उपसंचालक (वि.व ले) तथा उपायुक्त (लॉटरी कर) कार्यालयाकडे करण्यात आलेली नाही.

(४), (५), (६) व (७) महाराष्ट्र राज्यात लॉटरी तिकीट विक्री करण्यात येणाऱ्या सर्व सोडतींवर आगाऊ लॉटरी कर भरणे महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर अधिनियम, २००६ अनुसार इतर राज्यांच्या प्रवर्तकांना (प्रथम विक्रेत्यांस) बंधनकारक आहे. उच्च न्यायालयाच्या दिनांक १४.०८.२००९ च्या निर्णयानंतर सर्व प्रवर्तक दि.२६.१०.२००९ पासून नियमितपणे आगाऊ लॉटरी कर शासन जमा करीत आहेत. त्यामुळे २००९ नंतर लॉटरी कराची थकबाकी नाही.

सन २००७ ते २००९ या कालावधीतील पुढील कंपन्याकडे रु.९३३.१४ कोटी इतकी लॉटरी कराची रक्कम थकीत आहे.

१) मे.स्वागत एजन्सी रु.७६.२२५ कोटी, (२) मे.समर्पण ट्रेडिंग प्रा.लि.-रु.१३४.४३ कोटी, (३) मे.केनलॉट गेमिंग सॉल्यूशन्स प्रा.लि.-रु.९.६८ कोटी व रु. २८.३० कोटी, (४) मे.ज्युपिटर गेमिंग प्रा.लि.-रु.३२३.०५५ कोटी, (५) मे.एस.एल.मार्केटिंग- रु.१३३.१४५ कोटी, (६) मे.श्वेता एंटर-प्रायझेस रु.२२८.३०५ कोटी.

प्रस्तुत कंपन्यांकडून लॉटरी कर थकबाकी वसुली, महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर अधिनियम, २००६ मधील कलम १८ अनुसार जमीन महसूलाच्या वसूली प्रमाणे करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले होते.

तथापि, थकबाकीदार प्रवर्तक कंपन्या त्यांनी दिलेल्या पत्त्यावर आढळून येत नाही. असे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे. आता पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यात तिकीट विक्री करण्यात येणाऱ्या लॉटरी योजनांची माहिती दर आठवड्यास परिपत्रकाद्वारे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाते. त्या व्यतिरिक्त अन्य लॉटरी योजना राज्यात चालविण्यात येत असल्याचे आढळल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यासंदर्भात गृह विभागास कळविण्यात येते.

-----------------

## बाभुळगाव, कळंब व राळेगाव (जि.यवतमाळ) या तालुक्यातील बेंबळा मुख्य कालव्यावरील बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(१७) * २३४७९ प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेंबळा (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) मुख्य कालव्याचे अजून ही १०० टक्के काम पूर्ण झाले नसल्याचे दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) बाभुळगाव, कळंब, राळेगाव (जि.यवतमाळ) या तालुक्यातील बेंबळा मुख्य कालव्या वरील लाभ क्षेत्रातील मुख्य कालवा, उपकालवा, वितरीका व त्यावरील बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे प्रवाही सिंचन होत नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदोष कामामुळे सिंचनाचे किती क्षेत्र प्रवाही सिंचनापासुन वंचीत आहे तसेच रब्बी हंगाम व उन्हाळी २०१५ मध्ये वितरीकाच्या शेवटपर्यंत पाणी पुरवठा करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदोष बांधकाम करणारे अभियंते व कत्रांटदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय. बेंबळा मुख्य कालवा ११३ कि.मी. चा असून किमी ८६ पर्यंतची कामे सलगतेने पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे प्रगतीत असून पुर्णत्वाच्या टप्प्यावर आहेत
(२) अंशत: खरे आहे.

बेंबळा प्रकल्पाच्या वितरण प्रणालीची कामे ८-१० वर्षापूर्वी झालेली आहेत. कालवे / लघुपाट हे काळ्या मातीतून गेलेले आहेत. कालव्यात झाडे-झूडपे वाढलेली आहेत. त्यामुळे कालव्याचे मातीकाम सकृतदर्शनी सदोष झाल्यासारखे वाटते.

कि.मी. १ ते ८५ या भागात सिंचन सुरु झालेले असून कालव्याची दुरुस्ती यांत्रिकी विभागामार्फत आवश्यकतेनुसार केली जाते.

बेंबळा कालव्यावरील आष्टा वितरीकेच्या सुरुवातीचे २ कि.मी. मध्ये भरावाच्या भागातून पाझर आढळतो. याबाबतची प्राथमिक चौकशी प्रगतीत आहे.
(३) आष्टा वितरीकेच्या पहिल्या दोन कि.मी. मधील पाझरामुळे वितरीकेच्या शेवटच्या भागात पाणी पोहोचत नाही. आष्टा वितरिकेवरील निर्मित सिंचन क्षमता २६४२ हेक्टर असून सन २०१४-१५ मध्ये खरीप हंगामात ७६९ हेक्टर व रब्बी हंगामात ३६६ हेक्टर असे एकूण ११३५ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यात आला.
(४) व (५) आष्टा वितरीकेच्या बाबत सुरु केलेल्या चौकशीअंती उचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**वासंबे, मोहपाडा व कांबा गावात (ता.खालापूर, जि.रायगड) येथील अनाथ आश्रमातील मुलींवर संस्था चालकांच्या मुलांनी अत्याचार केल्याबाबत**

**(१८) * २७४३६ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वासंबे, मोहपाडा व कांबा गावात (ता.खालापूर, जि.रायगड) येथील अनाथ आश्रमातील मुलींवर संस्था चालकांच्या मुलांनी अत्याचार केल्याची घटना माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व आतापर्यंत किती जणांना कोणत्या कलमान्वये अटक करण्यात आली आहे, व त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, शांती ऑर्फनाईज, मु.रिस.पो. मोहपाडा ता.खालापूर, जि.रायगड या अनाधिकृतरित्या चालणाऱ्या (महिला व बाल विकास विभागाची मान्यता नसलेली) बालकांच्या संस्थेतील मुलींवर संस्था चालकांच्या मुलांनी अत्याचार केल्याची घटना दि. २९/४/२०१५ रोजी बाल कल्याण समिती रायगड व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय रायगड यांनी भेट दिली त्यावेळी सदरची बाब निदर्शनास आली आहे.

(२) होय, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रायगड व बाल कल्याण समिती रायगड यांनी दि. २९/४/२०१५ रोजी भेट देवून चौकशी केलेली असून संस्थेतील बालकांची शासकीय उपजिल्हा रुग्णालय कर्जत जि.रायगड येथे वैद्यकीय तपासणी करण्यात आलेली आहे व त्यानुसार सदर संस्थेविरुध्द रसायनी पोलीस स्टेशन यांनी दि. १०/६/२०१५ रोजी गुन्हा दाखल केलेला असुन FIR क्र. ४७/२०१५ आहे. पोलीसांनी भा.द.वि. कलम ३७६ व बाल लैंगिक शोषणापासून प्रतिबंध अधिनियम २०१२ च्या कलम ४, व ८ अन्वये गुन्हा दाखल केलेला असून या बाबतीत प्रतिबंधात्मक उपाय व अधिक चौकशीसाठी संस्था चालकांचे दोन मुले नामे ख्रिस्तियिन राजेंद्र, जॉय राजेंद्र, व पत्नी सलोनी राजेंद्र यांना ताब्यात घेतले असून सद्य परिस्थितीत त्यांना जिल्हा सत्र न्यायालय अलीबाग यांनी न्यायालयीन कोठडी सुनावली असून सद्यस्थितीत प्रकरणाचा अधिक तपास पोलीस विभाग करीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील हिवरा जाटू शिवारामध्ये पाझर तलावाच्या कामात शेतक-यांची झालेली फसवणूक**

**(१९) * १७४६८ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील हिवरा जाटू शिवारामध्ये गट क्र.५५ मध्ये पाच एकरावर तलाव करण्याऐवजी कंत्राटदार व जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागाने १२ एकरावर पाझर तलाव करुन शेतक-यांची फसवणूक केल्याची तक्रार जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असून त्यासाठी लागणारी पूर्वसंमती घेतली नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पाझर तलावामध्ये ज्या शेतक-यांची जमीन बुडीत क्षेत्रात येणार आहे त्यांना त्याचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

अशा प्रकारची तक्रार मुख्य कार्यकारी, अधिकारी जिल्हा परिषद, हिगोंली यांचेकडे प्राप्त झाली आहे. तथापि, संबंधित शेतकऱ्यांची पूर्व संमती घेण्यात आलेली आहे.

(२) शेतकऱ्यांनी संमती दिली असल्यामुळे मोबदला देण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हा परिषदेकडून शेतकऱ्यांना पुरवठा करण्यात आलेल्या साहित्य खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(२०) * २११५० डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण समितीच्या बैठकीत काही सदस्यांनी विरोध दर्शविल्यानंतरही ठराव एकमताने पारित झाल्याची कार्यवृत्तांत चुकीचे नोंद करण्यात येऊन त्याचा आधार घेत अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना

ऑईल इंजिन पाईपचा पुरवठा करण्यात आल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण विभागातर्फे मागासवर्गीय शेतकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या डिझेल इंजिन साहित्य खरेदीला समाजकल्याण समितीने मंजूरी न घेता सहायक लेखा अधिकाऱ्यांनी परस्पर मंजूरी प्रदान केली व पुरवठाधारकांचे धनादेशही तातडीने वाटप केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून ४४ लाख ८८ हजार रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. आरसीनुसार शिवा कंपनीकडून निविदा मागविण्यात आलेल्या आहेत तसेच जिल्हा परिषद नागपूरचे सीईओ श्री.शिवाजी जोंधळे यांना या संबंधी दिनांक २८ एप्रिल,२०१५ रोजी तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याची तक्रार समितीच्या सहा सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर तक्रारीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा कोणता निर्णय घेतला आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

शासनाच्या दरपत्रकानुसार विभागिय कृषी व्यवस्थापक महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळास साहित्य खरेदीचे आदेश दिले असल्याने अन्य कंपन्याकडून निविदा मागविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा परिषद, सदस्य श्री.विनोद पाटील यांनी दि.२८/४/२०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडे त्यांचे समाधान होईपर्यंत बिल अदा न करणेबाबत लेखी निवेदन देण्यात आले होते. तथापि, सदर निवेदना पुर्वीच नियमानुसार देयके अदा करण्यात आली आहेत.

(४) प्राप्त झालेल्या साहित्यबाबत अद्याप कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**कोठारे (जि.चंद्रपूर) मध्य चांदा वन विभागांतर्गत वनपरिक्षेत्रात वीज प्रवाह असलेल्या तारेच्या स्पर्शाने सांबराची शिकार केल्याबाबत**

**(२१) * २६५९३ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोठारे (जि.चंद्रपूर) मध्य चांदा वन विभागांतर्गत वनपरिक्षेत्रात वीज प्रवाह असलेल्या तारेच्या स्पर्शाने सांबराची शिकार केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी आतापर्यंत किती जणांना कोणत्या कलमान्वये अटक करण्यात आली आहे,

(३) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ९,३९,४८ व ५१ अंतर्गत एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर आरोपींविरुध्द न्यायालयात प्रकरण दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चांदुर रेल्वे (जि.अमरावती) तालुका कृषि अधिकारी कार्यालयाने जलयुक्त शिवार योजनेत गैरव्यवहार केल्याबाबत**

**(२२) * २३७१२ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदुर रेल्वे (जि.अमरावती) तालुका कृषि अधिकारी कार्यालयाने जलयुक्त शिवार योजनेत यापूर्वी केम प्रकल्पांतर्गत केलेली कामे पुन्हा दाखवून शासनाचा लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि, दैनिक देशोन्नती वर्तमानपत्रात “अनेक नाला खोलीकरणाची कामे कागदोपत्री” अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) होय.

वर्तमानपत्रातील बातमीच्या अनुषंगाने उपविभागीय कृषी अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांनी पहाणी केली आहे.

जलयुक्त शिवार अभियान मध्ये चांदुर रेल्वे तालुक्यातील एकूण १७ गावे निवडण्यात आली आहेत. निवडण्यात आलेल्या १७ गावामध्ये ६ गावे समन्वयीत कृषि विकास प्रकल्प (केम) मधील आहेत.

समन्वयीत कृषि विकास प्रकल्प (केम) मधून ६ गावामध्ये अस्तित्वात असलेल्या १५ सिमेंट नालाबांध मधील १ मीटर खोली पर्यंत गाळ काढण्यात आला होता जलयुक्त शिवार अभियान गाव आराखड्यामध्ये या सिमेंट नालाबांध मध्ये खोलीकरण व रुंदीकरण यांचा समावेश ग्रामसभेच्या मागणीनुसार केला होता त्यानुसार अतिरिक्त २ मीटर खोलीकरण तसेच रुंदीकरण करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मौजे खोरानिनको (ता.लांजा,जि.रत्नागिरी) येथील वनक्षेत्रातील खैरांच्या झाडांची चोरी झाल्याबाबत

**(२३) * १९६१९ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यातील दुर्गम भागातील मौजे खोरनिनको येथील सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या शिदोबाचे रान या वनविभागाच्या अखत्यारित असलेल्या ५० हेक्टर जागेतील सुमारे १५० खैरांच्या झाडांची बेसुमार तोड करुन चोरी करण्यात येत असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखो किंमतीची खैरांची झाडे चोरीस जात असताना वन विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार, यास जबाबदार असणा-याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मौजे खोरनिनको ता.लांजा येथील सहयाद्रीच्या पायथ्याशी असलेल्या शिदोबाचे रान या वन विभागाच्या अखत्यारितील संपादित वनक्षेत्रात सुमारे ६० हेक्टर क्षेत्रात १४५ खैर वृक्ष प्रजातीचे झाडांची चोरट्यांनी मुळासकट खोदून तोड केल्याची घटना माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आलेली नसून ३१ जानेवारी, २०१५ व माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आलेली आहे.

(२) सदरची घटना निदर्शनास येताच वनरक्षक, कोर्ले व वनपाल लांजा यांनी रु.६३,८४०/- चा माल जप्त केला सदरील माल मौजे खोरनिनको व प्रभानवल्ली येथे जप्त केला असून हा माल वनरक्षक, कोर्ले यांच्या ताब्यात लांजा येथे ठेवण्यात आला आहे. प्रकरणी आरोपीवर त्वरीत गुन्हा नोंद करुन त्यांचेवर कोर्टात केस दाखल करणेत आली आहे. त्यामुळे याकडे वन विभागचे दुर्लक्ष झालेले नाही.

(३), (४) व (५) भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत ५ आरोपींना दिनांक ६.४.२०१५ रोजी अटक करुन त्यांच्या विरुध्द गुन्हा नोंदवून त्यांना मा.न्यायदंडाधिकारी राजापूर, डेप्युटेशन, लांजा यांचे न्यायालयात दिनांक ६.४.२०१५ रोजी हजर करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा निर्णय दिनांक ६.५.२०१५ रोजी झाला असून मा.न्यायालयाने प्रत्येक आरोपीस रक्कम रु.५००/- दंड केला व जप्त मुद्देमाल अपीलाची मुदत संपलेनंतर वनविभागाने लिलाव करावा असा निर्णय न्यायालयाने दिलेला आहे.

-----------------

**कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये रुग्णांना जंतूसंसर्ग रोखण्यासाठी अँटीबायोटीकचे इंजेक्शन दिल्यावर त्यांना त्रास जाणवू लागल्याबाबत**

**(२४) * २६७३७ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विरेद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल असलेल्या ९ रुग्णांना जंतूसंसर्ग रोखण्यासाठी अँटीबायोटीकचे इंजेक्शन दिल्यावर रुग्णांना ताप, थंडी, डोकेदुखी, उलट्या होऊन त्रास जाणवू लागला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये घबराट निर्माण झाली, सदरहू इंजेक्शनचा पुरवठा राज्य पातळीवरुन करण्यात आला होता, हे लक्षात घेता शासन यावर कोणती त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

ग्रामीण रुग्णालय, कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथे दाखल असलेल्या १० रुग्णांना जंतूसंसर्ग रोखण्यासाठी ॲन्टीबायोटीकचे इंजेक्शन दिल्यावर ताप आला व उलट्या झाल्या.

(२) उपरोक्त बाब निदर्शनास आल्यानंतर सदर औषधांचा वापर त्वरित थांबविण्यात आला. तसेच सदर औषधाच्या संबंधित बॅचेसचा वापर थांबविण्याबाबत सर्व जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना आरोग्य सेवा संचालनालयाच्या दिनांक २०.०४.२०१५ च्या पत्रान्वये सुचना देण्यात आल्या आहेत.

सदरहू औषधांचे नमुने शासकीय विश्लेषक, औषध नियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई यांच्याकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले असून तपासणी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

सदर १० रुग्णांवर योग्य तो औषधोपचार करण्यात आला असून त्यांची प्रकृती ठीक झाल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे व अन्य मुलभूत सुविधाच्या कामांसाठी अनुदान देण्याबाबत

**(२५) * २०३५६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षासाठी मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे व अन्य मुलभूत सुविधाच्या कामांसाठी अनुदान देण्याबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. विकास-२०१४/प्रक्र.६८/यो-६, दिनांक १ ऑगस्ट, २०१४ अन्वये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ४५ कामांसाठी २ कोटी ३० लाख रुपयांचे जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांना वितरण आदेश निर्गमित करण्यात आलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधीनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत गटारे व अन्य मुलभूत सुविधांच्या ४५ कामांसाठी वितरीत करण्यात आलेल्या निधीतून आजमितीस किती व कोणकोणती कामे पूर्ण झाली आहेत तसेच अद्यापी किती व कोणकोणती कामे सुरुच झालेली नाहीत,

(३) सदरहू शासकीय निर्णयानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ४५ कामांसाठी २ कोटी ३० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झालेला असतानाही कामे सुरु न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) मा.लोकप्रतिनिधीनी सुचविलेली व अद्यापी सुरु न झालेली कामे विनाविलंब हाती घेवून ती लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत सन २०१४-१५ या वित्तीय वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या ४५ कामांपैकी २६ कामे पूर्ण, ८ कामे प्रगतीत असून ११ कामे शासनाने रद्द केलेली आहेत.

(३) मंजूर कामांपैकी ११ कामांसाठी जमिनीची बक्षिसपत्रे संमतीपत्रे उशिरा प्राप्त झाल्यामुळे व निवडणुक आचारसंहितेमुळे सदर कामे वेळीच सुरु करता आली नाहीत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील स्वस्तात रक्त पुरवठा करण्यासाठी शासनाने सुरु केलेली योजना असफल ठरल्याबाबत

**(२६) * २६६८९ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात स्वस्तात रक्त पुरवठा करण्यासाठी शासनाने सुरु केलेली योजना असफल ठरल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील रुग्णांना सांगवी येथील पुणे जिल्हा रुग्णालयातल्या रक्त पेढीतून रक्त पुरवले जात असून इथे अत्याधुनिक सुविधाच नसल्याने प्लेटलेट्स प्लास्मा असे घटक मिळतच नाहीत, हे खरे आहे काय,

(३) तसेच उक्त योजनेचे कॉल सेंटर फक्त औंध रुग्णालयातच असून खासगी संस्थेकडे राज्यातली आकडेवारी देण्यास ते तयार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजना असफल ठरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) उक्त योजना योग्य प्रकारे राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) अशंत: खरे आहे,

रक्तघटक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मेट्रो रक्तपेढी उभारण्याचे काम अंतीम टप्प्यात आहे.
(३) अशंत: खरे आहे,

तथापि, आकडेवारीची मागणी केल्यास राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांचेकडून उपलब्ध होऊ शकेल.
(४) उक्त योजनेंतर्गत जिल्हा रुग्णालय औंध, पुणे रक्तपेढीमधून १०९ रुग्णांना Whole Blood Bag पुरविण्यात आल्या आहेत. त्यामुळे योजना असफल होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) जीवन अमृत सेवा योजनेंतर्गत मागणी प्रमाणे रक्त पुरविण्यात येते. रक्तघटक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मेट्रो रक्तपेढी उभारण्याचे काम अंतीम टप्प्यात आहे.

-----------------

**नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळयासाठी पंचवटी परिसरातील तपोवन रुग्णालयासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी व यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२७) * २७७६७ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.योगेश घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळयासाठी पंचवटी परिसरातील १०० खाटांचे हॉस्पीटलसाठी आवश्यक स्टाफ आणि यंत्रसामुग्री उपलब्ध न झाल्यामुळे सिंहस्थांमधील भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंहस्थ काळामध्ये साधुसंत आणि भाविकांना रुग्णसेवा उपलब्ध होण्यासाठी उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

पंचवटी परिसरात नाशिक महानगरपालिकेचे १०० खाटांचे तपोवन रुग्णालय असून, सदर रुग्णालयाकरीता मुख्य वैद्यकीय अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व इतर तद्नुषंगिक अधिकारी/कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

सदर रुग्णालयासाठी आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्यात आली असून, त्यामध्ये ई.सी.जी. यंत्रणा, ऑक्सिजन सिलेंडर, यासोबत १३ रुग्णवाहिकांचा समावेश आहे.

(२) या रुग्णालयामधील आपत्कालीन कक्ष, पुरुष/महिला अंर्तरुग्ण कक्ष, बाह्यरुग्ण कक्ष, लघुशस्त्रक्रियागृहाच्या माध्यमातून सर्व अत्यावश्यक सुविधा भाविकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

तसेच याशिवाय आपत्कालीन साथीचा प्रार्दुभाव नियंत्रणासाठी आवश्यक ती औषधसाठा उपलब्ध ठेवण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर शहरातील आश्रम शाळेतील मुलांना बेकायदेशीररित्या गोव्याला नेऊन त्यांचे लैंगिक शोषण केल्याबाबत

**(२८) * २३१८९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरमधील कावळा नाका परिसरातील एका संस्थेतर्फे 'मेरी वॉन्लेस' या हॉस्पीटलच्या परिसरातील ' आगापे ' या संस्थेच्या आश्रमशाळेतील ११ मुलांना बेकायदेशीररित्या गोव्यामध्ये नेऊन त्यांचे लैंगिक शोषण केल्यची घटना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्याअनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि अशा आशयाची बातमी, TV-९ या खाजगी दूरदर्शन वाहिनीवर दि. २४/४/२०१५ रोजी प्रसिध्द झाली आहे. मात्र सदरची मुले ही महिला व बाल विकास विभागातंर्गत मान्यताप्राप्त संस्थांमधील नाहीत. सदरची मुले मेरी वॉन्लेस हॉस्पिटल, कोल्हापूर येथे औषधोपचारार्थ दाखल होती.

(२) होय.

TV-९ या खाजगी दूरचित्रवाहिनीवर प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमातील तरतुदीनुसार जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय, कोल्हापूर व श्रीम. चोरगे, अध्यक्षा, बाल कल्याण समिती, कोल्हापूर यांचेमार्फत दिनांक २५.४.२०१५ रोजी मेरी वॉन्लेस हॉस्पिटल, कोल्हापूर या ठिकाणी गोव्यामध्ये सापडलेल्या मुलांच्याबाबत चौकशी केलेली आहे. सदर ठिकाणी मुले औषधोपचारार्थ दाखल करण्यात आलेली होती.

तसेच सदर घटनेबाबत पणजी पोलिस ठाणे, गोवा येथे फिर्याद क्र. ७६/१५, दिनांक १६.३.२०१५ नुसार गुन्हा नोंद झाला आहे. तसेच पणजी पोलिस ठाण्याचे तपासणी अधिकारी इन्स्पेक्टर श्री. विक्रम यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी सदरहू मुलांची वैद्यकीय तपासणी गोवा मेडिकल कॉलेज येथे करण्यात आलेली असून सदर बालकांचे वैद्यकीय अहवाल न्यायालयात दाखल केलेले आहेत. सदर मुलांवर लैंगिक अत्याचार झाले नसल्याबाबतचही त्यांनी सांगितले आहे. संबंधित प्रकरणातील आरोपींबाबतचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेले असून सदर प्रकरण सध्या गोवा येथील न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे अशी मौखिक माहिती त्यांनी दिली. तसेच संबंधितांविरुध्द अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा अधिनियम, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम व भारतीय दंड विधान संहित नुसार गुन्हा नोंद करुन योग्य ती कायदेशीर कार्यवाही करणे विषयी जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय, कोल्हापूर यांनी शाहुपूरी पोलिस स्टेशनला लेखी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**जळगाव जिल्ह्यातील नगरदेवळा येथील अग्नावती नदीवर २८ वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या धरणामध्ये गाळ साचल्याबाबत**

**(२९) * २४३८८ श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील नगरदेवळा येथील अग्नावती नदीवर २८ वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या धरणाची साठवण क्षमता २.७४ द.ल.घनफुट असून त्यामध्ये बराचसा गाळ साचल्याने धरण अतिशय उथळ झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच धरणामध्ये मोठेमोठी असंख्य झाडे झुडपे व इतर वनस्पतीची मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने धरणाच्या पाणी साठवण क्षमतेवर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याकरिता या धरणाची उंची १ कि.मी. वाढविण्याकरीता तसेच गाळ काढण्याकरीता स्थानिकांनी मा.जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ३१ मे, २०१५ रोजी एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या निवेदनानुसार या धरणाची उंची वाढविण्याकरीता तसेच गाळा काढण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

अग्नावती धरणाची साठवण क्षमता ३.७४ दलघमी इतकी असून, गाळ साठल्यामुळे धरण उथळ झाले आहे, अशी वस्तुस्थिती नाही.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) व (५) प्रकल्प धरणस्थळी उंची वाढीसाठी पाण्याची उपलब्धता नाही. त्यामुळे अग्नावती धरणाची उंची वाढविणेबाबत कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील मुरमा ग्रामपंचायतींतर्गत विविध कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(३०) * २५८३७ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील मुरमा ग्रामपंचायतींतर्गत विविध कामात झालेल्या गैरव्यवहारा प्रकरणी चौकशी करण्यात येऊ नये यासाठी एका माजी सभापतीने गटविकास अधिकारी व चौकशी समितीवर दबावतंत्राचा वापर केला आहे.

त्यामुळे दोन महिन्यापूर्वी नियुक्ती करण्यात आलेली चार सदस्यीय समिती केवळ कागदावरच असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) सदर प्रकरणी चार सदस्यीय समितीने दि. २४.०६.२०१५ रोजी मुरमा ग्रामपंचायत येथे प्रत्यक्ष भेट देवून चौकशी अहवाल सादर केला असून त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) या तालुक्यातील फुलआमला येथे ढाळीचे बांधकाम करणा-या मजूरांना मजूरी देण्याबाबत**

**(३१) * १७०१८ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) या तालुक्यातील फुलआमला येथे महात्मा गांधी ग्रामविकास रोजगार हमी योजनेअंतर्गत ढाळीचे बांधकाम करणा-या मजूरांना दोन महिन्यापासून मजूरी देण्यात आली नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्यामुळे सदरहू मजूरांची मजूरीची रक्कम त्यांना त्वरीत देण्याबाबत तसेच मजूरांना मजूरी देण्यास टाळाटाळ करणा-या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव खंडेश्वर, अमरावती यांना दिनांक १५ मे, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मंजूरांना काम केल्याची मजूरीची रक्कम त्यांना त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नांदगांव खंडेश्वर या तालुक्यातील फुलआमला येथील ढाळींचे बांधकाम करणाऱ्या मजुरांची मजुरी तात्काळ देण्याची कार्यवाही करण्याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) सदर मजुरांची मजुरी दिनांक १८/५/२०१५ रोजी अदा करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**रत्नागिरी जिल्ह्यात महावितरणकडून शेतकऱ्यांच्या कृषी पंपास वीज पुरवठा न केल्याबाबत**

**(३२) * १८४२९ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत अनुसूचित जाती, नवबौध्द घटकांतील शेतकऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या विहिरींना जिल्हा परिषद कृषी विभागाकडून तीन वर्षापूर्वी १९३ वीज पंप देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन वर्षात १९३ पैकी केवळ ५६ पंपाना महावितरणकडून वीज पुरवठा करण्यात आला व उर्वरित १३७ पंप धूळखात पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळले,

(४) असल्यास, त्यानुषंगाने दिरंगाईस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) तसेच सदर वीज पंपांना वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) जिल्हा परिषद कृषी विभाग, रत्नागिरी यांचे दि. ११.५.२०१२ नुसार १९३ शेतीपंपाना वीजपुरवठा करण्याबाबतची यादी दि. १४.०५.२०१२ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) सन २०११-१२ व २०१२-१३ या वर्षात १९३ त्यापैकी १८४ लाभार्थ्यांचे विहित नमुन्यातील अर्ज महावितरणकडे प्राप्त झाले आहेत. जून २०१५ अखेर त्यापैकी ६१ शेतीपंपांना वीजपुरवठा करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागात तीन चाकी सायकल वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(३३) * १८८६७ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागात सन २०१३-२०१४ मध्ये तीन चाकी सायकल वाटपात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे मे २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशतः खरे आहे.

श्री.बाबासाहेब महापूरे, शहर अध्यक्ष, प्रहार अपंग क्रांती आंदोलन यांनी दिनांक ११/५/२०१५ च्या अर्जान्वये सायकल वाटपात घोटाळा झाल्याची तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) उक्त प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, संगमनेर यांचेमार्फत चौकशी करण्यात आली जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने सन २०१३-१४ या वर्षामध्ये अपंग व्यक्तींना "तीन चाकी सायकल वाटप करणे" ही योजना घेतली होती. त्यानुषंगाने श्रीमती सोनाबाई रोकडे यांची निवड केली होती. पंचायत समितीवरुन संबंधितास वारंवार सूचना देऊन सदर व्यक्ती अपंग असल्याने सायकल घेण्यास येऊ शकली नाही. सदर सायकल पंचायत समितीच्या कर्मचा-यांमार्फत लाभार्थ्यांच्या घरी पोच केली आहे. याबाबत श्रीमती सोनाबाई रोकडे यांनी कोणतीही तक्रार नसल्याचे लेखी कळविले आहे.

सबब सायकल वाटपात कोणताही प्रकारचा घोटाळा झाला नसल्याने संबंधितावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत उपचारांअभावी दररोज १६ कोवळया जीवांचा होणारा मृत्यू

**(३४) * १६३९९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये रोज सुमारे १६ कोवळ्या जीवांचा अपू-या उपचारांअभावी मृत्यू होत असल्याचे राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २००८ ते २०१२ या कालावधीत मुंबईत सुमारे २९,७०० बालमृत्यूची नोंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई खालोखाल नाशिक, ठाणे, पुणे औरंगाबाद व नागपूर या शहरामधीलही बालमृत्यूचे प्रमाण अधिक असून मुंबईमधील १ वर्षात मृत्यू पावणा-या बालकांचे प्रमाणे हे इतर शहरांच्या पाच वर्षातील मृत्यूच्या प्रमाणाइतके आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत बालमृत्यूची कारणे काय आहेत व त्याला प्रतिबंध करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) मुंबईत सन २००८ ते २०१२ या कालावधीत एकूण ३२,६६४ इतके बालमृत्यू झाले आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

मुंबईमध्ये सन २००८ ते २०१२ या कालावधीत झालेले बालमृत्यू पुढील प्रमाणे आहेत :-

| वर्ष | बालमृत्यू |
|---|---|
| २००८ | ६,९८६ |
| २००९ | ७,११५ |
| २०१० | ६,७४६ |
| २०११ | ५,९४८ |
| २०१२ | ५,८६९ |
| एकूण | ३२६६४ |

इतर शहरातील माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

| शहर | बालमृत्यू |
|---|---|
| ठाणे | ३३६५ |
| नाशिक | १७२ |
| पुणे | ६११३ |
| औरंगाबाद | १७०७ |
| नागपूर | ८४२७ |
| एकूण | १९७८४ |

वरील दोन्ही कोष्टकांचे अवलोकन केले असता मुंबईच्या १ वर्षातील बालमृत्यूचे प्रमाण हे वरील ५ शहराच्या ५ वर्षातील एकूण बालमृत्यूच्या प्रमाणापेक्षा कमी आहे हे स्पष्ट आहे.

(५) संसर्गजन्य, अतिसार, श्वसनविकास ही बालमृत्यूची मुख्य कारणे असून यास प्रतिबंध करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून पुढील उपाययोजना करण्यात येतात :-

१) गरोदर मातांची लवकरात लवकर नोंदी व लसीकरण

२) प्रसुतिपूर्व व प्रसुति पश्चात नियमित आरोग्य तपासणी व उपचार तसेच गरोदर मातांना नवजात शिशुस स्तनपान करण्यात प्रोत्साहित करणे, तसेच लोहयुक्त गोळ्याचा पुरवठा करणे.

३) गरोदर मातांना सकस आहार व वैयक्तिक स्वच्छतेबाबत मार्गदर्शन

४) पाच वर्षाखालील मुलांचे नियमित व संपूर्ण लसीकरण तसेच त्यांना विटॅमिन ए जीवनसत्व नियमित देणे व जंतनाशक गोळ्यांचे वाटप.

५) मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत उपजत मृत्यू व अर्भक मृत्यू समिक्षा समिती स्थापन करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

त्याचप्रमाणे राज्य स्तरावर

१) जिल्हा रुग्णालयात व निवडक उप जिल्हा रुग्णालयात आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष काळजी कक्ष (SNCU) निर्माण करण्यात आला आहे.

२) जिल्हा रुग्णालयात व निवडक उप जिल्हा रुग्णालयात आजारी सॅम बालकांच्या व्यवस्थापनासाठी पोषण पुर्नवसन केंद्र (NRC)

३) जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम

४) गरोदर मातांना प्रसूती पूर्व, प्रसूती अंतर्गत व प्रसूती पश्चात सेवा अशा योजनांचा समावेश आहे.

-----------------

**राज्यातील अनुशेष असलेल्या भागांचा समतोल विकास करण्यासंदर्भात डॉ. केळकर समितीच्या अहवालाबाबत**

**(३५) * १७९७८ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : तारांकित प्रश्न क्रमांक ५८२८ ला दिनांक ५ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुशेष असलेल्या भागांचा समतोल विकास करण्यासंदर्भात डॉ.केळकर समितीने सादर केलेला अहवालातील शिफारशी स्विकारण्यासंदर्भात अभिप्राय देण्यासाठी नियुक्त केलेल्या उपसमितीने आपला अहवाल मंत्रिमंडळास सादर केला आहे काय,

(२) असल्यास, उक्त सादर केलेल्या अहवालातील शिफारशीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) उक्त प्रकरणी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३), व (४) डॉ.केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीच्या अहवालातील शिफारशींवर सर्व प्रशासकीय विभागांचे अभिप्राय विचारात घेऊन, अहवालातील शिफारशी स्वीकारण्यासंदर्भात अहवाल मंत्रिमंडळास सादर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०१५ अन्वेय मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उप समिती गठित करण्यात आलेली आहे.

या संदर्भात सर्व प्रशासकीय विभागांचे समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीच्या अहवालातील शिफारशींवर अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

सर्व प्रशासकीय विभागांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर समितीच्या अहवालातील शिफारशी स्विकारण्यासंदर्भात उपसमितीने आपला अहवाल मंत्रिमंडळास सादर करावयाचा आहे.

-----------------

**नांदेड जिल्ह्यातील तामसा भागातील अनेक गावात कृषी विभागाकडून करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत**

**(३६) * १७१०५ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील तामसा भागात कृषी विभागामार्फत विविध योजनेंतर्गत अनेक गावात कोट्यवधी रुपयांची बरीच कामे अपूर्ण राहिली असून ही कामे चूकीच्या पध्दतीने व गुत्तेदारी पध्दतीने करण्यात आली असल्याने ही कामे दर्जाहीन असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट दर्जाची कामे आणि जास्तीचे मापे घेऊन जास्तीची बीले सादर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती निकृष्ट दर्जाची कामे आणि जास्तीचे मापे घेऊन जास्तीची बिले सादर करणा-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच उर्वरित कामे पुन्हा चालू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**धुम्रपान व तंबाखू सेवन करण्या-या महिलांचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(३७) * २२५५३ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तंबाखू सेवन केल्याने राज्यात कॅन्सर होऊन मृत्यूचे प्रमाण वाढत असताना गेल्या काही वर्षात धुम्रपान व तंबाखू सेवन करण्या-या महिलांचे प्रमाण वाढत असल्याचे कॅन्सर पेशंट असोसिएशन यांनी केलेल्या पाहणीत आढळून आल्याचे दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांमधील कॅन्सरचे प्रमाण २०१३-१४ मध्ये १०.१ टक्के होते त्याप्रमाणात वाढ होऊन २०१४-१५ मध्ये हे प्रमाण १३.१ टक्के असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या मुंबईतील विविध भागातील रस्त्याच्या कडेला इमारतीच्या आडोशाला तरुण मुली धुम्रपान करताना आढळतात, सदर धुम्रपान रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) तसेच कॅन्सरचे प्रमाण वाढू नये या दृष्टीने शासनाने कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापी, कॅन्सर पेशंट एड असोशिएशन या संस्थेने २०१४ मध्ये मुंबईमधील काही विभागातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सर्वेक्षण केले होते. त्यामध्ये महिलांमधील कॅन्सरचे प्रमाण वाढल्याचा निष्कर्ष काढण्यात आलेला नाही.

(३) केंद्र शासनाच्या सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने कायदा, २००३ च्या नियम ४ नुसार सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास बंदी आहे. या कायद्यात दिलेल्या “सार्वजनिक ठिकाण” या व्याख्येमध्ये रस्त्याचा समावेश नाही. त्यामुळे रस्त्याच्याकडेला, इमारतीच्या आडोशाला धुम्रपान करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करता येत नाही.

(४) कर्करोगाचे जनजागरणाकरीता राज्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये कॅन्सरची माहिती दर्शविणारे बॅनर्स/पोस्टर्स लावण्यात आले आहेत. तसेच विविध आरोग्य दिनांचे निमित्ताने कार्यक्रमांचे आयोजन करुन त्यामध्ये जनजागृती करण्यात येते.

कर्करोगाचे प्राथमिक अवस्थेत निदानासाठी जनजागरण व संशयीतांना संदर्भसेवेने चाळणी चाचणी (Screening Test)

लक्षणांच्या आधारे संशयीत रुग्णांना वैद्यकीय महाविद्यालय व विभागीय महाविद्यालय कर्करोग संदर्भसेवा केंद्रा पुढील उपचाराकरीता पाठविण्यात येते.

----------------

**मौजे पदमावती (ता.भोकरदन, जि.जालना) येथील धरणाच्या उंचीकरणामुळे इ.क्लास जमिनीवरील घरे बाधित झाल्याबाबत**

**(३८) * २७१९५ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मासरुळ मध्यम प्रकल्प (ता.जि.बुलढाणा) अंतर्गत मौजे पदमावती (ता.भोकरदन, जि.जालना) येथील धरणाच्या उंचीकरणामुळे पाण्याच्या बाजुकडील इ.क्लास जमिनीवरील घरे बाधित झाली आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीवरील घरातून पाणी झिरपू लागले असून हे पाणी घरांच्या अंगणात येऊन साचत आहेत, त्यामुळे गावात डासांचा प्रादुर्भात वाढला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक गावकऱ्यांनी दिनांक १९ सप्टेंबर, २०१४ रोजी जिल्हाधिकारी, जालना यांना पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तद्नुसार धरणाच्या उंचीकरणामुळे बाधित झालेल्या घरांचे पुनर्वसन करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही. धरणाच्या उंचीकरणाचे काम अद्यापी झालेले नाही.

(२) नाही.

(३) अंशत: खरे आहे, स्थानिक गावकऱ्यांनी जिल्हा अधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार केला हे खरे आहे. मात्र शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही हे खरे नाही.

(४) दि. ३१.१०.२०१४ व दि. ११.०७.२०१५ क्षेत्रीय पहाणी करण्यात आली निवासी घरांमध्ये किंवा प्रागंणात ओलावा आढळून आला नाही.

(५) धरणाचे २ फुटाचे उंचीकरण प्रस्तावित आहे. सदर उंचीकरणापुर्वी गांव व जलाशयामध्ये ३ मी उंचीचा बांध घालण्याचे नियोजन करणेत आले आहे. सदर बांध धरणाची उंची वाढवणेपुर्वी टाकण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर वनविभागाच्या रेस्क्यू चमूला वन्यजीवांच्या उपचारसाठी निधी मिळत नसल्याबाबत

**(३९) * २२०८८ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर वनविभागाच्या रेस्क्यू चमूला वन्यजीवांच्या उपचारासाठी निधी उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागातील माकड, मोर, इतर पक्षी, हरीण, सांबर किंवा इतर अन्य वन्यजीव जखमी अवस्थेत आढळून आल्यास त्यांच्या उपचाराकरीता रेस्क्यू सेंटर प्रथमोपचाराची कुठलीही सुविधा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापैकी मोठया वन्यजीवांना जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्याकरिता चारचाकी वाहनांची सुविधा नसल्यामुळे त्यांचा जागीच किंवा रस्त्यांनी जाताना मृत्यू होतो, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्राण्यांना एखाद्या वेळेस गंभीर दुखापत झाली असता त्यांचा एक्स-रे किंवा सर्जरी करण्याचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे पाठवून सुद्धा वेळेवर निधी उपलब्ध करुन दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या वन्यजीवांच्या संवर्धनाकरीता शासनाकडून निधी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(६) उक्त वन्यजीवांच्या संवर्धनाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दिनांक २७.०३.२०१४ पासून नागपूर वनविभागात १ वनक्षेत्रपाल, २ वनपाल आणि ५ वनरक्षक असे एकूण ८ अधिकारी/कर्मचाऱ्यांचा समावेश करुन रेस्क्यू चमूची स्थापना करण्यात आली आहे.

सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ पर्यंत वन्यप्राण्यांच्या उपचारासाठी रु.४.७३ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(२) जखमी अवस्थेतील वन्यजीवांच्या उपचाराकरिता नागपूर शहरातील सेमिनरी हिल्स, सिव्हील लाईन येथे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तात्पुरत्या उपचारासाठी उपचार केंद्राचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून पूर्ण झाल्यावर वन विभागास हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

सद्यस्थितीत माकड, मोर इतर पक्षी हरीण, सांबर व इरत वन्यजीव जखमी अवस्थेत आढळून आल्यास त्यांचा उपचार शासकीय पशु महाविद्यालय, नागपूर येथील दवाखान्यात प्रथमोपचार करण्यात येतात.

(३) व (४) हे खरे नाही. नागपूर वन विभागातील उपलब्ध रेस्क्यू व्हॅनचा वापर वन्यप्राण्यांना रुग्णालयात दाखल करण्यासाठी केला जातो.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईच्या विस्तारासाठी आवश्यक असलेल्या सीवुड-उरण रेल्वे मार्गाबाबत**

**(४०) * १६७२० प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या विस्तारासाठी आवश्यक असलेल्या सीवुड-उरण २७ किलोमीटरच्या रेल्वे मार्गात वनजमिनींचा अडथळा निर्माण झाला असून, वन कायद्यामुळे ही जमीन मिळवता येत नसल्याने हा मार्ग रखडला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वन जमिनींवरील जागा ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

प्रस्तुत रेल्वे मार्गाकरिता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वनजमिन मागणीचा प्रस्ताव प्रकल्प यंत्रणेकडून प्राप्त झालेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तरंदळे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) गावास स्वतंत्र आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्याबाबत

**(४१) * २३०२७ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तरंदळे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून या गावात स्वतंत्र आरोग्य उपकेंद्र नसल्यामुळे १२ ते १५ किलोमिटर अंतरावर सावडाव येथे असलेल्या आरोग्य उपकेंद्रात उपचार घेण्याकरिता जावे लागत असल्यामुळे आजारी रुग्णाचे खूपच हाल होत असून, त्यांना अतिशय त्रास सहन करावा लागत असल्यामुळे दिनांक १५ ऑगस्ट, २०१३ रोजी तरंदळे ग्रामपंचायतीने स्वतंत्र आरोग्य उपकेंद्र मिळण्यासाठी ठराव करण्यात येवूनही जिल्हा आरोग्य केंद्र ओरस सिंधुदुर्ग यांच्याकडे पाठवूनही अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तरंदळे या गावी स्वतंत्र आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

तरदळे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावाची लोकसंख्या १४७६ इतकी असून या गावापासून उपकेंद्र सावडाव १२ ते १५ कि.मी. अंतरावर, प्राथमिक आरोग्य केंद्र नांदगाव १५ कि.मी. अंतरावर तर उपजिल्हा रुग्णालय, कणकवली ८ कि.मी. अंतरावर आहे. सावडाव आरोग्य उपकेंद्राच्या अंतर्गत येत असलेल्या गावातील रुग्णांना या उपकेंद्रामार्फत रुग्णसेवा पूरविण्यात येतात. तरंदळे येथे उपकेंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गुंजवणी-चापेट (ता.वेल्हे, जि.पुणे) धरणाच्या बुडीत क्षेत्रातील गावांचे धानेप गावांमध्ये गांवठाण पुनर्वसनास विरोध असल्याबाबत**

**(४२) * १७७३० श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुंजवणी-चापेट (ता.वेल्हे, जि.पुणे) धरणाचे काम पुन्हा चालू करण्यासाठी शासन पातळीवर हालचाली सुरु झाल्या असून बुडीत क्षेत्रात येत असलेल्या कोदापूर, कानंद व भोसलेवाडी या गावाचे गांवठाण पुनर्वसन धानेप गावांमध्ये होत असून धानेप गावांतील धरणग्रस्तांचा विरोध असल्याने या धरणग्रस्तांच्या प्रश्नासंदर्भात चर्चा करण्यात आलेल्या अधिका-यांना धरणग्रस्तांनी धानेप ग्रामपंचायत कार्यालयात डांबून ठेवले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी काय चौकशी केली व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी संबंधित प्रकल्पग्रस्तांचे विरोधात वेल्हे जि.पुणे येथील पोलिस ठाण्यात FIR- १८/१५ दि. २३/४/२०१५ अन्वये का.दं.वि. कलम- ३४१ व ३५३ खाली गुन्हा दाखल केला आहे. पुढील कार्यवाही वेल्हे जि.पुणे पोलीस ठाणे कडून प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात बालकांच्या प्रोटीन पावडर खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(४३) * १९३५३ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील कुपोषीत बालकांचे प्रमाण कमी असतांनाही प्रोटीन पावडर खरेदीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याने गट विकास अधिकारी व ग्रामविस्तार अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याकरिता राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे राजाध्यक्ष यांनी राज्याच्या मुख्य सचिवांकडे तक्रार केल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती प्रोटीन पावडर खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कारवाई केली नसल्यास, दिरंगाईची कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी प्राथमिक चौकशी केली आहे.

(३) व (४) प्राथमिक चौकशी अंती तक्रारीत तथ्य नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महड (ता.खालापूर,जि.रायगड) येथे मोठ्या प्रमाणात बेकायदेशीरित्या विक्री केलेल्या गुरुचरण जमिनीवरील अनधिकृत बांधकामाबाबत**

**(४४) * २६१६५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महड (ता.खालापूर, जि.रायगड) येथे मोठ्या प्रमाणात बेकायदेशीरित्या विक्री केलेल्या गुरुचरण जमिनीवरील अनधिकृत बांधकामामुळे गावातील लोकांची गुरे चरण्यासाठी व शेतावर जाण्याची वाटच बंद झाल्याची तक्रार ग्रामस्थांनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान कोकण विभागीय आयुक्त, नवी मुंबई, जिल्हाधिकारी-रायगड, उपविभागीय अधिकारी-कर्जत व तहसिलदार-खालापूर यांच्याकडे लेखी निवेदनादवारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे बांधण्यात आलेल्या चाळी व बंगल्यांमुळे तिर्थक्षेत्र म्हणून ओळखल्या जाणा-या अष्टविनायकापैंकी महड येथे येणा-या शेकडो भाविकांसाठी नविन प्रकल्प राबविताना अतिक्रमणामुळे अनेक अडचणी निर्माण होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात अष्टविनायकापैकी एक महड म्हणून ओळखल्या जाणा-या तिर्थक्षेत्राला बाधा निर्माण होवू नये म्हणून शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
महड (ता.खालापूर, जि.रायगड) येथे बेकायदेशीररित्या विक्री केलेल्या गुरुचरण जमिनीत अनधिकृत बांधकामे केलेली आहेत. परंतु गावातील लोकांची गुरे चरण्यासाठी व शेतावर जाण्याची वाट बंद केली आहे. हे खरे नाही.

तसेच ग्रुप ग्रामपंचायत खालापूरकडे दिनांक २८.०२.२०१५ रोजी अर्जदार यांनी अर्ज मागे घेतला असल्याचे लिहून दिले आहे.

(२) अशी बाब नाही.

(३) अनधिकृत बांधकाम करणा-यांवर ग्रामपंचायत खालापूर मार्फत दिनांक २८.१०.२०१४ अन्वये नोटीसा देण्यात आलेल्या असून संबंधितांवर कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खोची ते दूधगांव (जि.कोल्हापूर) दरम्यान वारणा नदीवरील पुलाचे काम सुरु करण्याबाबत

**(४५) * २५०४३ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोची ते दूधगांव (जि.कोल्हापूर) दरम्यान वारणा नदीवरील पूलासाठी पंतप्रधान ग्राम सडक योजनेतंर्गत तीन वर्षापूर्वी ६ कोटी ९१ लाख रुपयांचा निधी मिळाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामाकरिता निधी उपलब्ध होऊनसुध्दा अद्यापही या पूलाचे काम सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या पूलाचे काम रखडण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या पूलाचे काम किती कालावधीत पूर्ण करण्याचे शासनास अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यातील खोची ते दूधगाव दरम्यान वारणा नदीवरील पुलाच्या कामास दि. २५.०९.२०१२ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर काम प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतंर्गत टप्पा ११ मध्ये मंजुर आहे. सदर कामाच्या आतापर्यंत ३ वेळा निविदा मागविण्यात आल्या. तथापि, प्रथम वेळेस प्रतिसाद मिळाला नाही व पुढील दोन वेळेस अंदाजपत्रकीय दरापेक्षा अधिक दराच्या

निविदा प्राप्त झाल्याने सदर निविदा मंजुर करण्यात आल्या नाहीत. तद्नंतर चौथ्या वेळेस निविदा मागविण्यात आली असून सद्यस्थितीत निविदा प्रक्रियेबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) निविदा मान्यतेचे शासन आदेश निर्गमित केल्यानंतर १८ महिन्याच्या कालावधीत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ पाटबंधारे अंतर्गत राळेगाव कळंब तालुक्यातील सिंचन प्रकल्पाची अवस्था देखभाल व दुरुस्ती अभावी अतिशय खराब झाली असल्याबाबत**

**(४६) * २३४८१ प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ पाटबंधारे अंतर्गत राळेगाव कळंब तालुक्यातील सिंचन प्रकल्पाची अवस्था देखभाल व दुरुस्ती अभावी अतिशय खराब झाली आहे असे दिनांक १२ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाची १०० टक्के पाण्याचा साठा होत असुनसुध्दा १२ टक्के पेक्षा कमी क्षेत्र ओलीता खाली येते, हे खरे आहे काय,

(३) सिंचनाची प्रत्यक्षात सिंचन कमी असतांना आकडे वाढवून शासनाची दिशाभूल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

मागील ५ वर्षात राळेगांव व कळंब तालुक्यातील पुर्ण झालेल्या १९ प्रकल्पांमध्ये सरासरी ८६ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता व सरासरी सिंचन ३७ टक्के झालेले आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अरुणा नदीवर मध्यम पाटबंधारे प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(४७) * २४५२६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अरुणा नदीवर मध्यम पाटबंधारे प्रकल्प उभारण्यासाठी शासनाने सन १९९५ मान्यता दिली असून या प्रकल्पाला सन २०१४ मध्ये १७८ कोटी ४१ लाख रुपये अंदाजित खर्चाच्या सुधारित प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून या प्रकल्पाचे काम सन २००६ मध्ये सुरु होवून प्रकल्प सन २०१० अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) या प्रकल्पामुळे वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ४ हजार ३५७ हेक्टर आणि राजापूर तालुक्यातील अतिदुर्गम गावातील ४९८ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येईल असे नियोजित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(३) या प्रकल्पाला आवश्यक तो निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे प्रकल्पाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे काम शीघ्र गतीने हाती घेवून व लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने तसेच या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या आखवणे, भोम, नागपवाडी आणि हेतु या चार गावातील प्रकल्पग्रस्ताचे विनाविलंब योग्य प्रकारे पुर्नवसन होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यामध्ये अरुणा नदीवर अरुणा मध्यम पाटबंधारे प्रकल्प असून या प्रकल्पास शासनाने १९९५ मध्ये प्रशासकीय मान्यता रु. ५३.९४ कोटी किंमतीस दिली होती.

सदरची मान्यता व्यपगत झाल्याने महामंडळ स्तरावरुन सन २००४ मध्ये रु. १७८.४१ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तद्नंतर शासन स्तरावरुन २०१२ मध्ये रु. ६६९.७९ कोटी किंमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या धरणकामास मे २००६ मध्ये सुरुवात झाली असून, प्रकल्पाचे काम पाच वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन होते.

(२) होय.

या प्रकल्पामुळे वैभववाडी तालुका, जि.सिंधुदुर्ग मधील ४७६८.६० हेक्टर व राजापूर तालुका, जि.रत्नागिरी मधील ५४१.४० हेक्टर असे एकूण ५३१० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ देण्याचे नियोजन आहे.

(३) अंशत: खरे आहे.

प्रकल्प कामे प्रलंबित राहण्याचे अपुरा निधी पुरवठा हे एकमेव कारण नसून भूसंपादन व पुनर्वसन ही सुध्दा अन्य कारणे आहेत.

(४) पुनर्वसन गावठाणाची कामे पुर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात आहेत. ती प्रथम प्राधान्याने पुर्ण करुन तसेच प्रकल्पासाठी लागणाऱ्या उर्वरीत जमिनीचे संपादन करुन प्रथम टप्पा घळभरणी करण्याचे नियोजन आहे. यासाठी रु.७४ कोटीची तरतुद सन २०१५-१६ अर्थसंकल्पात केली आहे. तसेच या प्रकल्पाचा समावेश केंद्र शासनाच्या वेगवर्धीत सिंचन लाभ योजनेत करणेत आला आहे. निधी उपलब्धतेनुसार प्रकल्प जून, २०१८ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्हयातील मावळ तालुक्यातील राजमाची किल्ला परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्ष तोड सुरु असल्याबाबत**

**(४८) * २६६९६ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील मावळ तालुक्यातील राजमाची किल्ला शासकीय तसेच खाजगी वन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वृक्ष तोड सुरु असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुणेगाव, ठाकरवाडी (पांगोळी), सारख्या काही ठिकाणी पक्की बांधकामेही करण्यात येत असून यांच्यावर वन विभागाकडून कुठलीच कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

तथापि, जून, २०१५ मध्ये राजमाची किल्ला परिसरातील मौजे उधेवाडी, ता.मावळ येथील खाजगी मालकी गट क्र.१२४ एकूण क्षेत्र २.७० हे. पैकी अंदाजित १ हे. क्षेत्रावर कांरबा, कारवी, करबं, पांगारा इ. बिगर अनूसूचित वृक्षांची तोड निदर्शनास आली आहे.

(२) मौ.कुणेगाव व मौ.पांगळोली (ठाकरवाडी) येथे खाजगी वनक्षेत्रात बांधकामे निदर्शनास आल्यानंतर त्यांचेविरुध्द वनगुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(३) व (४) खाजगी मालकी गट क्र.१२४ मध्ये बिगर अनुसूचित वृक्षांच्या तोडीबाबत तहसीलदार, मावळ यांना कळविण्यात आले असून त्यांचेकडून चौकशी करण्यात येत आहे. वनक्षेत्रातील बांधकामाची सात अतिक्रमण प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली आहेत.

-----------------

**राज्यात स्मार्ट सिटीच्या धर्तीवर स्मार्ट ग्राम राबविण्याच्या निर्णयाबाबत**

**(४९) * २६६५२ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्मार्ट सिटीच्या धर्तीवर स्मार्ट ग्राम राबविण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१५ वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) ही योजना केव्हापासून अंमलात आणण्यात येईल व त्यानुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) प्रस्ताव विचाराधीन आहे.

(२) योजनेचा प्रारुप आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) मंत्री मंडळापुढे प्रस्ताव सादर करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्हा रुग्णालयातील शीतगृहाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(५०) * १६४०१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा रुग्णालयाची सद्य:स्थितीला फार मोठ्याप्रमाणावर दुरवस्था झाली असून मृतदेह ठेवण्यासाठी असलेले पाच शीत कप्प्यांपैकी, तीन कप्पे गेले वर्षभरापासून बंद असल्याने मृतदेह बाहेर ठेवावे लागत असल्याने, बेवारस मृतदेहांची प्रचंड दुर्गंधी पसरत असून मृतदेहाचे विघटन होऊन त्याची मोठ्या प्रमाणावर हेळसांड होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा रुग्णालयाचा कारभार सुधारण्यासाठी तसेच मृतदेह ठेवण्याची शीतगृहे दुरुस्त करुन त्यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, अहमदनगर येथे एकूण २ बॉडी ठेवण्याच्या ५ कॅबिनेट असून सर्व चालु स्थितीत आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नगर (जि.अहमदनगर) तालुक्यातील बालसुधारगृहातून सहा मुले पळून गेल्याबाबत

**(५१) * १६७२१ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर (जि.अहमदनगर) तालुक्यातील बालसुधारगृहातून सहा मुलांनी सुरक्षारक्षक कर्मचाऱ्यांचे नाक-तोंड दाबून पळून गेल्याचे दिनांक ३१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदरील मुले पळून जाण्याची नेमकी कारणे काय, तसेच पळून गेलेल्या मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे काय,
(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) होय.
(३) सदरची मुले ही गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यातील आहेत. अशा मुलांच्या पालकांशी संपर्क साधण्यात आला तथापि, मुलांना जामीन करुन घेण्यास पालक इच्छुक नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळेच सदरची मुले पालकांकडून प्रतिसाद मिळत नसल्यामुळे पळून जाण्याची संधी पाहतात, व यातूनच पाणी मागण्याच्या बहाण्याने सुरक्षा रक्षकावर प्राणघातक हल्ला करुन पळून गेलेली आहेत.

पोलिसांनी मुलांचा शोध घेतला असून पळून गेलेल्या पैकी १ मुलगा मृत सापडला असून उर्वरित मुलांपैकी १७ जून रोजी १ मुलगा व १६ जुलै, २०१५ रोजी ४ मुले सापडली असून त्यांना पुन्हा संस्थेत दाखल करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आजूबाजूचा परिसर डोंगरी विकास योजनेत समाविष्ट करण्याबाबत**

**(५२) * २७६९८ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आजूबाजूचा परिसर डोंगरी असून तसेच डोंगरी विकास योजनेत समाविष्ट करण्याबाबतचे सर्व निकषाची पुर्तता होत असूनही सदरहू तालुक्याचा डोंगरी विकास योजनेत अद्यापही समावेश करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दापोली तालुक्याचा डोंगरी विकास योजनेत समावेश न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, दापोली तालुक्याचा सदर योजनेत तातडीने समावेश करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) (२) व (३) मंत्रीमंडळ उपसमितीच्या शिफारशीनुसार व मंत्रीमंडळाच्या मान्यतेनंतर निकषांच्या आधारे राज्यातील डोंगरी विभागाचे निकष सन १९९० मध्ये निश्चित करण्यात आले. तदनंतर सन १९९५ मध्ये डोंगरी क्षेत्रात बदल करावयाचा झाल्यास महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर या यंत्रणेकडून अहवाल मागवून त्यानुसार गावांचा/तालुक्यांचा डोंगरी विभाग क्षेत्रात समावेश करण्याचा शासनाने निर्णय घेतला. सन २००८ मध्ये महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र नागपूर (MRSAC) यांनी उपग्रहाद्वारे डोंगरी भागाची पुर्नतपासणी करुन सादर केलेल्या अहवालांच्या अनुषंगाने कोणताही बदल न करता आहे तीच सद्य:स्थिती कार्यान्वित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. शासन निर्णय नियोजन विभाग क्र.डोंविका-२००९/प्र.क्र.६/का.१४८३, दिनांक १८.१.२०१० अन्वये, डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांबाबत विहित केलेल्या उपरोक्त मार्गदर्शक निकषांनुसार रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुका पात्र ठरत नसल्याने त्यांचा समावेश करण्यात आलेला नाही.

-----------------

**मौजे रेवली-मौजे साकुर्डे (ता. दापोली, जि.रत्नागिरी) येथील लघु पाटबंधारे प्रकल्प गेल्या चार वर्षापासून बंद अवस्थेत असल्याबाबत**

**(५३) * २७६९९ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रेवली-मौजे साकुर्डे (ता. दापोली, जि.रत्नागिरी) येथील लघु पाटबंधारे प्रकल्प गेल्या चार वर्षापासून बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकल्पाला स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत करण्यात आलेल्या आहेत. तथापि, त्यांना अद्यापही जमिनीचा मोबदला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाची मुळ अंदाजित किंमत किती व सुधारित किंमत किती आहे. सदर प्रकल्पास मुळ मान्यता व सुधारित मान्यता केव्हा देण्यात आली, आतापर्यंत किती निधीची तरतूद केली व किती निधी खर्च झाला त्यातून कोणकोणती कामे केली तसेच अद्याप किती निधीची आवश्यकता असून प्रकल्प केंव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) सदर प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याबाबत व शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

प्रकल्पाचे काम सन २०१२-१३ पासून बंद आहे. भूसंपादनाचा अंतिम मोबदला मिळाल्यानंतरच काम सुरु करावे अशी प्रकल्पग्रस्तांची मागणी आहे.

(२) हे खरे आहे.

(३) प्रकल्पाची मुळ प्रशासकीय मान्यता किंमत रुपये ९३१.६९ लक्ष आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पावर झालेला खर्च हा प्रशासकीय मान्यता किंमतीच्या मर्यादेत असल्याने सुधारित प्रशासकीय मान्यता अद्याप घेणेत आलेली नाही. प्रकल्पावर माहे जून, २०१५ अखरे रुपये ६८१.१८ लक्ष खर्च करण्यात आलेला आहे.

प्रकल्पाचे मुख्य धरणाचे मातीकाम करण्यात आलेले आहे व सांडवा खोदाई करण्यात आलेली आहे निधी उपलब्धतेनुसार डिसेंबर, २०१७ मध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(४) निधी उपलब्धतेनुसार भूसंपादनाची रक्कम देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.